# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं. ०५/२०२१

श्री. लक्ष्मण किसन बोराटे
ता. फलटण जि. सातारा. } तक्रारदार

विरूध्द्

१. श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण
जि.सातारा
२. नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण
जि.सातारा } वि. प

श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण जि.सातारा या शिक्षण संस्थेचे नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण यांचेकडील तक्रारदार श्री. लक्ष्मण किसन बोराटे यांनी दि.०५/०७/२०२१ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

माझी नेमणूक दि.०३/०३/२०१४ पासून पूर्णवेळ सहा. प्राध्यापक पदी संस्था नेमणूक दिली आहे. परंतू नेमणूक दिनांकापासून स्थान निश्चिती व वेतन विद्यापीठ नियमानुसार मिळाले नाही. संस्थेने महाराष्ट्र शासनाचे सेवा शर्तीचे कोणतेही नियम लागू केले नाहीत व कसलेही लाभ दिले नाहीत.

मी वेळोवेळी प्राचार्य व संस्थेस नेमणूक दिनांकापासून सेवेचे सर्व लाभ मिळावेत असे तोंडी व लेखी स्वरूपात निवेदन देत होतो. तरीही आपण त्याकडे वेळोवेळी दुर्लक्ष केले दि. ०८ जुलै २०१५ रोजी पासून दि. २९/०१/२०२० पर्यंत मी महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्त होतो. या कालावधीत मी अनेकवेळा संस्थेस सेवा शर्तीचे लाभ देण्याची विनंती केली होती.

**संस्थेचे दि.२४/०३/२०२३ रोजीचे तक्रारीबाबतचे निवेदन :**

१.आमचे संस्थेतर्फे चालविणेत येणारे नामदेवराव सूर्यवंशी (बेडक) महाविद्यालय, फलटण हे सन २००४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर महाराष्ट्र शासनकडून मान्यता घेवून चालविणेत येत आहे. सदर

महाविद्यालयामध्ये कला व वाणिज्य शाखा कार्यरत असून फलटण सारख्या ग्रामीण भागामध्ये आमचे महाविद्यालयामुळे तेथील व आसपासच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय निस्वार्थपणे करून दिली आहे.

२.सदर महाविद्यालय व श्री. बोराटे यांची नेमणूक करताना केलेली जाहिरात प्रक्रिया आणि नेमणूकीची कागदपत्रे सोबत जोडली असून त्यावरून हे दिसून येईल की, श्री. बोराटे यांची नेमणूक कायम विनाअनुदानित तत्वावर झालेली आहे. सबब जाहिरातीस अनुसरून अर्ज करताना सदर महाविद्यालय संपूर्णपणे कायम विना अनुदानित असलेची संपूर्ण कल्पना श्री. बोराटे यांना होती व त्यास अनुसरूनच त्यांनी नोकरीसाठी आमचे संस्थेच्या महाविद्यालयाकडे अर्ज केला होता.

३.सदर विनाअनुदानित तत्वावरील पदामुळे आमचे महाविद्यालयाने श्री. बोराटे यांना आपलेकडे शिवाजी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे प्राप्त होणा-या फी मधून महाविद्यालयाच्या सर्व खर्चाचा विचार करून योग्य ते वेतन देत आलेले आहेत. सदर वेतन त्या त्या शिक्षकांच्या बॅंक खातेवर सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा फलटण येथे दरमहा जमा केले जाते त्याचा बिनशर्त स्विकार श्री. बोराटे यांनी आजतागायत केलेला आहे. तसेच त्यांचा प्रॉव्हिडंट फंड नियमानुसार भरला जात होता त्यामुळे वेतनाबाबत त्यांची कोणतीही तक्रार प्रिन्सीपल ऑफ इस्टोपल नुसार ग्राहय धरता येणार नाही.

४.आम्हांला मिळणा-या फी बाबत आम्ही वेळोवेळी विद्यापीठाकडे फी वाढ करणेची मागणी करत आलेलो आहोत. त्याबाबतची कागदपत्रे सोबत जोडली आहेत. पंरतू त्याबाबत शिवाजी विद्यापीठाने आम्हांला योग्य ती फी वाढ करून दिली नसल्याने महाविद्यालयाला मिळणा-या फी मध्ये चालविणे अर्थिक दृष्टया अडचणीचे व जिकिरीचे ठरत आहे. या म्हणणे सोबत आम्ही महाविद्यालयाचे गेल्या वर्षाचा (सन. २०२१-२२) ऑडिट रिर्पोट सादर करत असून त्यावर महाविद्यालय आम्ही तोटयात चालवत असलेचे दिसून येईल.

५.श्री. बोराटे यांनी त्यांचे तक्रारीत शासन नियमाप्रमाणे वेतनाची केलेली आहे. परंतू त्यांना लागू असणारे शासन नियम कोणते? आम्ही दिलेले वेतन व त्यांना मिळणा-या वेतनामध्ये कोणता व कसा फरक पडला? याची कोणतीही स्पष्टता केली नसलेने अर्ज फेटाळून लावणेत यावा.

६.तसेच श्री. बोराटे यांनी स्थाननिश्चिती करणेबाबत महाविद्यालयाकडे आज अखेर कोणतही अर्ज सादर केलेला नाही.

७.वेतन मागणीबाबत आम्ही मा. शिक्षण संचालक (उच्चशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे दि. १६/०८/२००७ चे पत्र जोडत असून त्यावरून हे स्पष्ट आहे की, विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणा-या शुल्कातून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन व भत्ते देणेचे सदर पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे.

८.थोडक्यात आम्ही श्री. बोराटे यांचे वेतन व स्थान निश्चितीबाबत केलेली कार्यवाही ही योग्य व कायदेशीर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारे महाविद्यालय तोटयात का असेना पण ते चालू राहवे या उदात्त हेतूने केलेले आहे. आमचे महाविद्यालय फलटण एस.टी. बस स्टॅण्ड समोरच असलेने जास्ती संख्येने ग्रामीण भागातील मुली व मागास विद्यार्थी प्रवेश घेतात. त्यामुळे आमचे महाविद्यालय हे एक सामाजिक समता प्रस्तापित होणेचे साधन याच बांधीलकीतून चालवत आहोत.

श्री.बोराटे यांनी आपले सहा.प्राध्यापक पदाच्या नेमणूकीच्या दिनांकानंतर म्हणजेच आठ वर्षापेक्षा जास्त कालावधी ओलांडल्यानंतर संस्थेला व महाविद्यालयाला केवळ त्रास देण्याच्या हेतूने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केलेचे स्पष्ट दिसून येते. सबब उपरोक्त सर्व मुद्यांचा गांर्भियाने विचार करून श्री.बोराटे यांची तक्रार नामंजूर करणेत यावी.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदाराची प्रस्तुत तक्रार ही जाबदार शिक्षण संस्थेमध्ये दि.०३/०३/२०१४ पासून पूर्णवेळ नेमणुक झालेली असताना देखील जाबदार संस्थेने नेमणुक दिनांकापासून स्थाननिश्चिती, वेतननिश्चिती व वेतन विद्यापीठ नियमानुसार दिलेले नाही किंवा संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या सेवाशर्तीचे कोणतेही नियम लागू केलेले नाहीत व कसलेही लाभ दिलेले नाहीत. तरी दि.२१/०१/२०२१ पर्यंत सेवाशर्तीचे लाभ त्यांना देण्याचे जाबदार संस्थेस आदेश व्हावेत, असे तक्रारदाराने म्हटले आहे.

जाबदार संस्थेने दि.२४/०३/२०२३ रोजी आपले लेखी म्हणणे सादर केले असून तक्रारदाराची तक्रार फेटाळून लावावी अशी मागणी केलेली आहे. जाबदार संस्थेच्या कथनानुसार जाबदार संस्थेचे नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय हे सन २००१ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर महाराष्ट्र शासनाकडून मान्यता घेवून चालविण्यात येत आहे. तक्रारदाराची नेमणुक करताना त्यावेळी केलेली जाहिरात प्रक्रिया व त्यांच्या नेमणुकीची कागदपत्रे जी याकामी जोडलेली आहेत त्यावरुन हे स्पष्टपणे दिसून येते की, तक्रारदाराची नेमणुक कायम विनाअनुदानित तत्त्वावर झालेली असून त्याची संपूर्ण

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

कल्पना तक्रारदाराना नियुक्तीपत्र दिलेल्या तारखेला दिली होती. सदर विनाअनुदानित तत्त्वावरील फायदे जाबदार महाविद्यालयाने तक्रारदाराना विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानुसार करण्याचे विद्यार्थ्याकडून प्राप्त होणा-या फिमधून महाविद्यालयाचा सर्व खर्चाचा विचार करुन योग्य ते वेतन दिलेले आहे. ज्याचा तक्रारदाराने स्वीकार केलेला आहे. त्यांचा सर्व भविष्यनिर्वाह निधी देखील नियमानुसार भरला जात होता. सदरचे महाविद्यालय हे कायमच तोटयात चालल्याचे दिसून येते. ज्या शासन नियमानुसार तक्रारदाराने वेतनाची मागणी केलेली आहे ते शासन नियम कोणते व त्यांना प्रत्यक्ष दिलेले वेतन व त्यांना मिळणा-या वेतनामध्ये कसा फरक पडला याची स्पष्टता तक्रारदाराने केलेली नाही आणि तक्रार अर्ज फेटाळून लावण्यात यावा.

मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांच्याकडील दि.१६/०८/२००७ च्या पत्रावरुन हे स्पष्टपणे दिसून येते की, विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणा-या शुल्कातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन भत्ते देण्याचे आहे. थोडक्यात तक्रारदाराचे वेतन व स्थाननिश्चितीबाबत केलेली कार्यवाही योग्य व कायदेशीर आहे. सबब तक्रारदाराची तक्रार नामंजूर करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरण सुनावणीस घेतले असता उभयपक्षकारांनी आपापल्या कथनाच्या पृष्ठार्थ प्रतिज्ञा पत्रे सादर करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे तक्रारदार व जाबदार संस्था यांनी आपआपले शपथ पत्रे सादर केलेली आहेत. तक्रारदारानी सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रात तक्रारदारानी शपथेवर त्यांचेकडून दि.२२/०१/२०२० रोजी एका प्रकरणात अडकवून जबरदस्तीने राजीनामा लिहून घेण्यात आला असे शपथेवर कथन केले आहे. प्रस्तुत तक्रार तक्रारदाराने दि.०५/०७/२०२१ रोजी ज्या समितीपुढे सादर केलेली आहे तसेच तक्रारदाराच्या शपथेवरील कथनावरुन हे स्पष्ट होते की, तक्रार दाखल करतेवेळी तक्रारदार हा संस्था, महाविद्यालयाच्या सेवेत राहिलेला नव्हता. त्यांनी दिलेला राजीनामा हा स्वेच्छेने दिला की जबरदस्तीने लिहून घेतला यांची चौकशी करण्याचा अधिकार या समितीला नाही. ती बाब एक तर दिवाणी न्यायालयाच्या अखत्यारित किंवा विद्यापीठ न्यायपिठासन यांचेकडे दाखल करता येते. तशी त्यांनी केलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठं कायदा २०१६ च्या कलम ७९(१) चा विचार करता विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीकडे केवळ विद्यमान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनाच तक्रार दाखल करता येत असल्याचे दिसून येते. त्या कलमाचा समितीने विचार केला असता असे आढळून येते की, शिक्षक व शिक्षकेतर पदावर नसलेल्या कर्मचा-यांना सदर समितीकडे त्या कलमाशी अभिप्रेत असणा-या बाबीवर तक्रार दाखल करण्याची मुभा त्यास दिलेली नाही. ज्या अर्थी तक्रारदार

तक्रार दाखल करतेवेळी शिक्षकच नव्हते त्याअर्थी त्यांची ही तक्रार कायद्यानुसार चालण्यास पात्र नाही. तक्रारदाराचे इतर हक्क असतील ते त्याचे त्याने शोधावे व त्याचा उपयोग करुन घ्यावा. परंतु या कारणास्तव ही तक्रार चालविण्याचा अधिकार नाही, या निष्कर्षावर ही समिती आली आहे. सबब समिती खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

प्रस्तुतची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

दिनांक : 0 2 MAY 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे )

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(डॉ.एस.पी.हंगिरगेकर )

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(डॉ. ए.एच. कोळेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)